# महाराष्ट्र राज्यात स्त्रियांचे स्थान

**मेहरुन्निसा दलवाई**
३१५५ नित्यानंदनगर क्रमांक ४, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०६९

गेल्या काही वर्षामध्ये स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि बलात्कार याविरोधी एक संघटित आवाज निरनिराळ्या व्यासपीठांवरून, विचारवंतांकडून, सामाजिक कार्यकर्त्यांकडून आणि न्यायपंडितांकडून उठविला जात आहे ही एक अतिशय महत्त्वाची आणि चांगली गोष्ट आहे, स्वागत करण्यासारखी गोष्ट आहे, यापूर्वी स्त्रियांवर अत्याचार होत नसत असे नाही, महिलांवर बलात्कार झाले नाहीत असेही नाही. स्त्री ही मूलतःच एक दुर्बल घटक म्हणून कल्पिली गेली आहे. तिचे स्थान पारंपारिक समाजात एक दुर्बल घटक आणि दुय्यम असे राहिले आहे. मनुस्मृतीमध्येसुद्धा स्त्रीला दुय्यम स्थान दिलेले आहे. काही बाबतीत जसे व्यभिचारी स्त्रीला मनूने सुचविलेली शिक्षा ही कठोर आहेच, पण पुरुषांच्या संदर्भात तिचा विचार समपातळीवर, समदृष्टिकोनातून केला गेलेला नाही. धर्मातून निर्माण झालेल्या काही परंपरा आणि कल्पना या जशा जातीजातींमध्ये फरक करतात, विषमता निर्माण करतात, तसे या जातींतील स्त्रियांना विषमतेचे स्थान देतात. चातुर्वर्णीय रचना असो, सतीची पद्धत असो किंवा विधवा विवाह असो, सांप्रदायिक धर्म आणि त्याच्या परंपरा या समाजात विषमता आणि दुर्बल घटक निर्माण करण्यास कारणीभूत झालेल्या आहेत. मी समाजशास्त्रज्ञ नाही. सगळ्या धर्मांचा मी खोलवर अभ्यास केलेला नाही. पण वरवर पाहातानासुद्धा असे निश्चितपणे दिसते की, धर्म समाजातील बऱ्याचशा अनिष्ट गोष्टींचे, तणावांचे मूळ आहे. या परंपरा आणि काही अनिष्ट गोष्टी गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांमध्ये हिंदू समाजाने काही प्रमाणात झुगारून दिल्या आहेत. मी येथे फक्त धर्मांचा सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचा विचार करते आहे. येथे एक उदाहरण देता येईल. आणि ते म्हणजे देवदासीच्या प्रथेचे या विषयावर काही मंडळींनी अधिक अभ्यास आणि विचार केला आहे. देवदासींच्या मुक्तीसाठी महात्मा फुले समता प्रतिष्ठान लढा देत आहे. मी त्यांचा उल्लेख अशासाठी केला की, ही प्रथा यल्लाम्मा देवीच्या नावावर चालू आहे. स्त्रीला गुलामीत ढकलणारी, तिला अत्याचार भोगल्याला मोकळे सोडणारी, वेश्या व्यवसायाकडे वळणाऱ्या अशा अनिष्ट प्रथेचे मूळ असलेली यल्लमादेवी २० व्या शतकाच्या ८१ सालात लोकशाही, धर्मनिरपेक्षता, आधुनिक मानवी मूल्ये मानणाऱ्या, १२५ वर्षांहून अधिक समाजसुधारणेची परंपरा असलेल्या आपल्या समाजामध्ये अजूम जागृतदेवी समजली जाते ! आपले त्यांच्याकडे लक्ष वेधले ते डॉ. बाबा आढाव, डॉ. अनिल अवचट यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपण त्यांचे ऋणी असले पाहिजे. अशा गोष्टी आपल्या समाजात घडतात, आजही घडत आहेत, ही शरमेची आणि लाजिरवाणी गोष्ट आहे. ब्रिटिशांनी केलेला एकही जुना कायदा ही प्रथा मोडण्याकरिता शासनाने उपयोगात आणलेला नाही, ही त्याहून लांछनास्पद गोष्ट आहे. विचार केला तर असे वाटते की, समाजप्रबोधनाचे, धार्मिक आणि सामाजिक सुधारणेचे वारे हे वरवर वाहत गेलेले आहेत. अवघा समाज घुसळून निघाला पाहिजे आणि या जिद्दीने काम करणे आवश्यक आहे. मी सुरवातीलाच म्हटले की, स्त्रीवर होणाऱ्या बलात्काराविरुद्ध आणि अत्याचाराविरुद्ध आवाज अलिकडेच काही काळ उठवला गेला आहे.

मथुरेचे प्रकरण आणि त्यानंतर माया त्यागी हिचे प्रकरण या दोन प्रकरणांमुळे साऱ्या देशाचे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांकडे आणि बलात्काराकडे लक्ष वेधले गेले. संसदेमध्ये चर्चा झाली. सुप्रीम कोर्टापर्यंत मथुरेचे प्रकरण गेले. मुंबई व अन्य शहरांमध्ये बलात्कार विरोधी परिषदा आणि निदर्शने झाली. वर्तमानपत्रात भरपूर प्रसिद्धी मिळाली आणि इतके असूनसुद्धा स्त्रिया-

वरील अत्याचार, बलात्कार कमी झालेले आहेत असे दिसत नाही. उजेडात येणाऱ्या प्रकरणांचीसंख्या बघितली तर उजेडात न येणाऱ्या प्रकरणांची संख्या किती असेल याची कल्पना करवत नाही. काही दिवसांपूर्वीच संगमनेर येथे एका खेड्यात सरपचाने विडी कामगार स्त्रीवर केलेल्या बलात्काराची हकिगत मी वाचली. सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी तेथे जाऊन ते प्रकरण धसास लावले. हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांत पसरलेल्या गरीब आणि दुर्बल घटकांमध्ये स्त्रीचा अगदी खालचा नंबर आहे. त्यांच्यावर अत्याचार आणि बलात्कार होणार नाहीत अशी हमी निर्माण करणारी, असा विश्वास निर्माण करणारी समाजव्यवस्था आणि नैतिक मूल्ये अस्तित्वात नाहीत. अशी हमी, हा विश्वास आणि मानवी मूल्ये समाजाच्या खालच्या थरापर्यंत कशी रुजवली जातील, याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. काम फार अवघड आहे आणि स्वातंत्र्यकाळातील गेल्या ३४ वर्षांत जो सांस्कृतिक आणि सामाजिक बदल व्हावयास हवा होता तो झालेला दिसत नाही. जे संक्रमण होईल असे वाटले होते ते झालेले नाही. हा बदल घडवून आणण्यासाठी नव्या वाटा, नव्या दिशा शोधण्याची आवश्यकता आहे का, हे पण तपासले पाहिजे.

असे समजले गेले की स्त्री कमवायला लागली, स्वत:च्या पायांवर उभी राहीली की ती स्वतंत्र आणि मुक्त होईल. हा समज बरोबर आहे का? कमवणाऱ्या स्त्रीलासुद्धा आमच्याकडे नवरा पायातील वहाण पायातच राहिली पाहिजे असे समजतो. आत्महत्यांचे प्रमाण कमवणाऱ्या स्त्रियांत किती आहे? बरे, अत्याचार व बलात्कार हे केवळ पुरुषांकडूनच होतात असे नाही, तर स्त्री-पोलिस पुरुष-पोलिसांना हे करावयास मदत करतात असे आपल्या देशातील काही तुरुगातून दिसून आले आहे! तेव्हा आपण स्त्री-पोलिस आणि स्त्री-पोलिस अधिकारी यांचे प्रमाण वाढवण्यास सांगतो तेव्हा या स्त्रियांना योग्य शिक्षण यासबंधी दिले गेले पाहिजे, आणि अत्याचारविरोधी स्त्री संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा या महिला पोलिसांशी कायमचा संपर्क असण्याची काहीतरी योजना असली पाहिजे. विशेषत: स्त्री-वर अत्याचार किंवा बलात्कार होतो तेव्हा, मघाशीच मी एका विडी-कामगार बाईची हकिगत सांगितली. कामगार संघटनेने येथे लक्ष देणे आवश्यक आहे. केवळ त्यांच्या आर्थिक मागण्यांवर भर देऊन गप्प बसू नये. अखेर आर्थिक आणि सामाजिक प्रगती हातांत हात घालून झाली नाही तर समाजातील समतोल बिघडेल. हा समतोल केवळ कायद्यातील बदलाने शक्य नाही. अर्थात कायदा निश्चितच बदलला पाहिजे. सध्याच्या कायद्यांत बलात्कारित स्त्रीची उघड उघड मानहानी होते आणि ही होणार नाही अशी कायद्यात जरुर तरतूद केली पाहिजे. मी काही ढोबळ मुद्दे आपल्यासमोर ठेवले आहे. पण कायद्याच्याही काही मर्यादा आहेत. विशेषत: सामाजिक क्षेत्रामध्ये या मर्यादांचा विचार आपण केला पाहिजे.

स्त्रियांच्या संबंधी विचार करताना मुसलमान स्त्रियांचाही विचार करा. आपल्या समाजातील मुसलमान स्त्रिया हा पण एक महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य घटक आहे. आमच्या पैगंबराने आठ बायका केल्या. मला वाटते कोठेतरी आपले चुकले आहे हे त्यांना नंतर कळले असावे आणि म्हणून ही संख्या मुस्लीम मुसलमान पुरुषांसाठी त्यांनी ४ पर्यंत खाली आणली. म्हणजे एकावेळी चार फोर लिव्हिंग वाइव्ज इन लॉफुल वेडलॉक! आपल्या संबध आयुष्यात पुरुष ४० का करीना! तेव्हा हा मुसलमान पुरुष आपल्या पत्नीला काहीही कारण नसताना जबानी तलाक देऊ शकतो. या स्त्रीला शरियतच्या कायद्याप्रमाणे दत्तक घेण्याचा अधिकार नाही. मुसलमान स्त्रीला पुरुषा एवढा वारसा हक्कात भाग नाही कोर्टातसुद्धा २ मुसलमान स्त्रियांची जबानी शरियत कायद्याप्रमाणे एका पुरुषाच्या जबानी-बरोबर समजली जाते! तिला नागरी हक्क नाहीत, कसल्याही आधुनिक मूल्यांचा आधार तिचा कायदा तिला देत नाही. स्त्री व गुलाम यांच्यामध्ये माझ्या मताप्रमाणे शरियत कायद्यामध्ये काही विशेष फरक केलेला नाही. आणि या गुलामीतून तिला मुक्त करायची आहे याचा विचार सर्वांनी केला पाहिजे.